PUNE RESEARCH SCHOLAR ISSN 2455-314X
AN INTERNATIONAL MULTIDISCIPLINARY JOURNAL VOL 2, ISSUE 2

# खान्देशातील आभीर-यादवांच्या राजवटी

**प्रा. विशाल अशोक आहेर**
सहाय्यक प्राध्यापक (इतिहास विभाग)
के. एच. कॉलेज, गारगोटी ता. भूदरगड
जि. कोल्हापूर पिनकोड-४१६२०९ **महाराष्ट्र**

## प्रास्ताविक व आभीरांची पुर्वपिठीका

आभीर या लोकसमुहाची माहिती विभिन्न ऐतिहासिक व धार्मिक ग्रंथ तसेच प्राचीन अभिलेख,व व नाणी इ.विभिन्न ऐतिहासिक आधारातुन प्राप्त होते.आभीरांनाच यादव ,गोप ग्वाल,अहिर,अयार,गोल्ला,घोष,राव ,रावत विभिन्न नावाने संबोधले जाते .रामायण,महाभारत,हरिवंश,विष्णुपुराण,पदम्पुराण,भागवतपुराण,नंदवंशप्रदिप,शक्तीसंगमतंत्र इ.प्राचीन धार्मिक ग्रंथात तसेच कौटिल्याचे अर्थशास्त्र,पतजंलीचे महाभाष्य,विष्णुशर्माचे पंचतंत्र,भरतमुनीचे नाटयशास्त्र,टॉलेमीचे द पेरीप्लस ऑफ द एरिथ्रीअन सी,शुद्रकाचे मृच्छकटिकम,तमिळ भाषेतील शिल्लप्पदिकारम, अमरकोश इ.प्राचीन काळातील ग्रंथांबरोबरच मध्ययुगातील अनेक ऐतिहासिक ग्रंथांमध्ये आभीरांचा उल्लेख येतो . आभीर अथवा अहिर समाज प्राचीन काळापासुन भारतातील विभिन्न प्रांतात पसरलेला दिसुन येतो .पंजाब व हरियाणापासुन अहिर -आभीर समाजाचे स्थलांतरण पुर्वेकडे उत्तर प्रदेश,बिहार ,नेपाळ ,पश्चिम बंगाल ,मध्यप्रदेश ,छत्तीसगडकडे तर राजस्थान ,गुजरात ,यामार्गे दक्षिणेकडे ते महाराष्ट्र ,आध्रंप्रदेश,कर्नाटक ,केरळ व सुदुर दक्षिणेकडे तमिळनाडु पर्यंत जाउन पोहचले त्या प्रदेशांमध्ये त्यांनी आपल्या असंख्य राजवटींची प्रस्थापना केली व त्याबरोबरच गोपालन ,भागवत संप्रदाय ,कृष्णभक्ती चा प्रसार व प्रचार केला तसेच भाषा,कला,साहित्य ,नृत्य ,नाटय इ.अनेक क्षेत्रात बहुमोल योगदान दिले आहे.असा हा लोकसमुह महाभारत कालखंडात मथुरेपासुन दक्षिणेकडे गुजरात खान्देशात मोठया प्रमाणात पसरला होता . महाभारतात आभीरांचा उल्लेख यादव, गोप असा करण्यात आला आहे.महाभारतात यादवांच्या १८ शाखांचे वर्णन येते त्यातील आभीर ही शाखा प्रभावी ठरल्यामुळे उत्तर काळात आभीर हा यादव या शब्दास पर्यायवाचक शब्द बनला .पदम्पुराणात भगवान विष्णु म्हणतात **हे मथुरेतील अहिरांनो माझा आठवा जन्म तुमच्यात होइल** . श्रीकृष्ण मथुरेहुन द्वारकेला आले त्यांच्याबरोबरच अहिर वा यादव समाजाचेही दक्षिणेत आगमन झाले.आजही हरियाणा ,राजस्थान ,गुजरात ,खान्देश या प्रांतात हा समाज मोठया प्रमाणात आढळतो.खान्देशला आभीर देश वा अहिर देश असेही म्हणतात[१].

## खान्देशातील आभिरांविषयी विद्वानांची मते

आभीर हा संस्कृत भाषेतील शब्द असुन ६ व्या शतकानंतर अपभ्रश भाषेच्या विकासकाळात मुळ आभीर या शब्दातील भी शब्दाचे उच्चारण ही असे करण्यात येउ लागले व आभीर या संस्कृत शब्दाचे अहिर हे अपभ्रष्ट रूप तयार झाले या अपभ्रष्ट रूपातील अहि या शब्दावरून अहिर अशी मांडणी केल्यामुळे काही विद्वानांनी त्यांना नागवंशीय असेही संबोधण्याचा प्रयत्न केला तर काही विद्वानांनी अहिर–अहि+इर म्हणजे नागांचे दमन करणारे असाही अर्थ काढण्याचा प्रयत्न केला आहे. परंतु मुळ संस्कृत भाषेतील आभीर या शब्दाचा अर्थ निडर असा होतो.

**महाराष्ट्र शासन गॅझेटिअर –**

अहिर हे सिथियन वंशाचे असावेत अशी आजवरची समजुत होती ,पण संशोधनाअंती ते आर्यच असावेत असे मानले जाते[२].

**संसदिय ॲक्ट–**

अहिर आदि जाति क्षत्रिय आहे[३]

**श.गो.जोशी (१९४०)**

आभीर हे यादववंशी आहेत यादवांनी आठव्या शतकात दक्षिणेत राज्य केले व १२ व्या व १३ व्या शतकात देवगिरी इथे त्यांची सत्ता असल्याचे दिसते... तात्पर्य आभीर नावाचा एक प्रबळ आर्यवंश हिंदुस्थानात होउन गेला हे इतिहास पुराणावरून सिद्ध होते[४]

**पा.मा.चांदोरकर**

श्रीकृष्णांनी आपले बालपण ज्यांच्यात घालवले ते गोकुळ वृंदावनातील नंदादि गोप हे आभीर होते .हे प्रसिद्धच आहे .यादव हेच गोप उर्फ आभीर होय .यादवांनाच गोप ही सर्वसाधारण संज्ञा होती.ब्रजातील नंदादी गोप हेही मुळचे यादव होते .गोप–आभीर एक स्वतंत्र जात नसून एक धंदा होता आणि यादवांनी तो आपल्या आवडी खातर पत्करलेला होता असे दिसते.[५]

**भा.र.कुलकर्णी**

अहिरांची शस्त्रास्त्रे तलवार ,तलवार ,ढाले परशु आर्यांच्या समान होते.ते पशुपालन करत ते पितृपुजक अग्नीपुजक होते आणि कोणत्याही युद्धात अहिर दृष्टिगोचर होतात .आभीर मुळ युद्धप्रिय प्रवृत्तीचे लोक होते ,म्हणुन त्यांची गणना श्रेष्ठ योद्ध्यांमध्ये केली जात होती.[६]

**डॅा.रा.श्री.मोरवंचीकर**

कृष्णाचे व अहिरांचे रक्ताचे नाते आहे ,ते त्यांचे दैवत व लोकप्रिय नेतृत्व आहे .आभीर कृषीप्रधान संस्कृतीचे जनक होते .जलक्रिडा ,नृत्य अहिरांचे छंद होते .त्यांच्याच नावाने खान्देशात चित्रकला ,शिल्पकला ,वास्तुकला यांचा विकास झाला .पितळखोरा ,घटोत्कच ,बाघ इ लेण्या त्यांच्या उच्चाभिरूचीचे दर्शन घडवितात .अशा श्रेष्ठ आभीर संस्कृतीस मी नमन करतो[७].

**डॉ.दा.गो.बोरसे**

देवगिरीच्या यादवांना अहिरराजे ,गवळीराजे म्हटले जाई. जाडेजा व चुडासामा स्वतःला चंद्रवंशीय अहिर मानत होते .अहिरांचे मुळस्थान भारत आहे आणि ते या मातृभुमीचे सपुत आहेत. ते सुर्यपुत्र असुन यदुवंशीय आर्य म्हटले जातात.आर्यत्वाचे जे आवश्यक लक्षण आहे ते त्यांना पुर्णरूपाने लागु होते.[८]

**वि.का.राजवाडे**

अहिर हे जातिसंस्थ लोक म्हणुन इतिहासात प्रथम दृष्टोत्पतीस येतात आणि ते आजही तसे परंपरेने जातीसंस्थच आहेत.त्यांचे देवधर्म आर्यांच्या प्रमाणे पुर्वी होते व सध्याही आहेत.[९]


**ठाकुर देशराज –प्रसिद्ध जाट इतिहासकार**

हमारा अपना तो ये खयाल है की भारत की मौजुदा क्षत्रिय जातीयोमे अहिर सबसे पुराने क्षत्रिय है जब तक जाट ,गुजर ,राजपुत ,मराठा इनकी सृष्टी भी नही हुई थी ,अहिरोंका अभ्युदय हो चुका था[१०]

## खान्देशातील आभीरांच्या राजवटी

आभीर ही आर्य जमात महाभारत काळापासुनच बलाढय राज्यकर्ते म्हणुन प्रसिद्ध आहे .इ.स.पुर्व ५०० वर्षापुर्वी त्यांचे नेपाळ मध्ये सत्ता असल्याचे विभिन्न ऐतिहासिक पुराव्यांवरून स्पष्ट होते .आर.जी.भांडारकर यांच्या मते हरीवंशाच्या अनुषंगाने आभीर जातीचा अधिकार मथुरेच्या समीपस्थ मधुबनापासुन द्वारकेच्या आसपास होता.[११]हरियानातील अहिरवाल प्रदेशात अहिरांनी महाभारत काळापासुन इंग्रज राजवटी पर्यंत अनेक राज्यांची स्थापना केली. मध्यप्रदेशातील अवंती येथे चंडप्रदयोत हा आभीर राजा राज्य करत होता. आंध्र प्रदेशातही त्यांनी राज्य स्थापन केले वसुसेन अहिर ३ –या शतकात नागार्जुनकोंडा येथे राज्य करत होता.महाभारत काळानंतर अहिर दक्षिणेत गेले त्यांना अयार म्हटले गेले.आजही तमिळनाडुत ते मोठया संख्येने आहेत[१२].ऐतिहासिक पुराव्यानुसार अहिरांनी १ ल्या शतकात गुजरातेत राज्यसत्ता स्थापन केल्या गुजरातेतील भुज ,जुनागड ,कच्छ ,द्वारका,जामनगर,गीर इ.भागात अहिर मोठयाप्रमाणात आहेत याच भागातुन त्यांचे खान्देशात आगमन झाले.गोपालनाच्या दृष्टिकोनातुन उपजाउ भुमी असल्यामुळे ते इथे स्थिरावले व त्यांनी विविध राज्यांचा पाया घातला .त्यांनी स्थापन केलेल्या राजवटी खालीलपणे.

१. नासिक-गंगापुरचे आभीर घराणे
२. त्रैकुटक आभीर घराणे
३. नंदुरबार-नंद अहिर
४. गोपराष्ट्र-अंजनेरी
५. आसा अहिर-आसिरगड
६. देवगिरीचे यादव घराणे
७. मालेगावचे जाधव घराणे
८. वल्खचे घराणे
९. गाविलगड-अहिर वा गवळीराजे
१०. भामेर-लक्ष्मीदेव अहिर
११. थाळनेर- जिंवाजी अहीर १२.प्रकाशा -ईश्वरात अहीर




नकाशात दाखविलेली ठिकाणे प्रमाणबदध् नाहीत वाचकांना सामान्य अंदाज यावा यादृष्टिने दिली आहेत.

**नासिक-गंगापुरचे आभीर घराणे (इ.स.२३० ते ४१७)**

टॉलेमी याने इ.स. १ ल्या शतकात पेरीप्लस ऑफ द एरीथ्रीअन सी या ग्रंथात गुजरातमधील अहिर लोकसमुहाच्या उपस्थितीची नोंद केली आहे. याच काळात शक आक्रमकांनी या ठिकाणी आपले वर्चस्व प्रस्थापित केले.या काळात आभीर शकांच्या पदरी सेनापती महाक्षत्रप म्हणुन होते ,संधी मिळताच अहिरांनी स्वतंत्र राज्याची स्थापना केली त्या संदर्भातील अभिलेख उपलब्ध झाले आहेत .गुजरातेतील ईश्वरसेन अहिर याने इ.स.२३० मध्ये सातवाहन घराण्याचा पराभव करून आभीर राजवंशाची स्थापना केली[१३] नासिक येथील पांडवलेणे येथील अभिलेखातुन व पुराणांमधुन ,तसेच ईश्वर सेनच्या नाण्यांवरून आपणास या घराण्याची माहिती प्राप्त होते. त्याचे राज्य नासिक खान्देशपासुन देवगड,गोव्यापर्यंत पसरलेले होते.त्याने इ.स.२४९ मध्ये राज्याभिषेकाच्या समयी आभीर संवत सुरू केला,तो पुढे अनेक राजवटींमध्ये वापरला गेला.याच घराण्यातील वसुसेन अहिर याने ३ -या शतकात आंध्रप्रदेशातील नागार्जुनकोंडा याठिकाणी राजवट स्थापन केल्याचे नागार्जुनकोंडा येथील शिलालेखावरून ज्ञात होते.[१४]

**त्रैकुटक घराणे (इ.स.४१५ ते )**

नासिकच्या आभीर घराण्याच्या अस्तानंतर त्यांचेच नातेवाईक व मांडलिक त्रैकुटकांनी स्वतंत्र सत्ता प्रस्थापित केली डॉ.भगवानलाल इंद्र,डॉ.के.पी.जायस्वाल ,डॉ.मिराशी,डॉ.शोभना गोखले इ.विद्वानांनी त्रैकुटकांना आभीर असे म्हटले आहे.नासिकच्या आजुबाजुला असणा-या तीन पर्वतांमुळेच त्यांना त्रैकुटक हे नामाभिधान प्राप्त झाले.त्रैकुटकांनी ईश्वरसेन अहिराप्रमाणेच आपल्या साम्राज्याचा विस्तार कोकणातही केला.त्यांची राजधानी अनिरूदधपुर किंवा आजची अंधेरी होय.त्रैकुटक राजे स्वतःला परमवैष्णव म्हणत,भागवत धर्माचे ते कट्टर अनुयायी असले तरी त्यांनी इतर धर्माबाबतीत सहिष्णु धोरणाचा अवलंब केला.त्यांच्या राज्यात समृद्धी व शांतता नांदत होती.[१५]

**आसा अहिर ब-हाणपुर(इ.स.७०० -१४०० इ.स.)**

७ व्या शतकापासुनच आसिरगड परीसरात आसा अहिर च्या पुर्वजांचा प्रभाव होता .आसा अहिर याने १४ व्या शतकात हा किल्ला बांधला. आसा+अहिर+गड= आसिरगड अशी शब्दाची व्युत्पत्ती केली जाते.फरिश्ताने हा किल्ला आसा अहिर याने बांधल्याची पुष्टी केली आहे.मध्यप्रदेशातील ब-हाणपुर शहराच्या दक्षिण दिशेला २० कि.मी. दुर सातपुडा पर्वतरांगेत हा किल्ला स्थित आहे.सध्या हे ठिकाण मध्यप्रदेशात असले तरी पुर्वी तो खान्देशाचाच एक भाग म्हणुन ओळखला जायचा गुजरातच्या द्वारकेपासुन ते मध्यप्रदेशातील ब-हाणपुर पर्यंतच्या प्रदेशात अहिर संस्कृतीचा उदय व विकास झाला.आसा अहिरकडे ५००० म्हशी,५००० गायी,२००००मेंढया असल्याचे सांगितले जाते अर्थात अहिरांनी अत्यंत प्राचीन काळापासुन चालत आलेला व्यवसाय राज्य स्थापनेबरोबर सुरू ठेवलेला दिसतो कारण ते परंपरागत श्रेष्ठत्वाचे प्रतिक मानले गेले. १३९९ मध्ये फारूखी राजवटीतील नासीरखान याने शरणागतीचे नाटक करून आसा अहिर यास कपटाने ठार केले.

**देवगिरीचे यादव**

सेवनचंद्र प्रथम याने देवगिरीच्या यादव घराण्याची ९ व्या शतकात स्थापना केली.देवगिरीच्या यादवांना खान्देशात अहिरराजे अथवा गवळी राजे असे म्हटले जाई[१६].या घराण्याची प्रथम राजधानी चांदोर (चांदवड) होती त्या जवळील देवळा या गावी अहिर लोकांची मोठी वसाहत आहे तेथुनच ते चांदवड व देवगिरीकडे रवाना झाले असावेत.ते स्वतःला विष्णुद्भव,यादवकुल भुषण परम भट्टारक असे म्हणत.या राजांच्या नावांवरून ते कानडी भाषिक असल्याचा बोध होतो मात्र आभिरांनी फार पुर्वी दक्षिणेकडे स्थलांतरे केली व तेलगु ,कानडी,तमिळ,अशा अनेक दाक्षिणात्य भाषेचा अंगिकारही त्यांनी केला.तसेच त्या भाषांना आपल्या आभिरी या भाषेने प्रभावितही केले.देवगिरीच्या यादवांच्या काळातच मराठी भाषा आणि संस्कृतीचा विकास झाला.[१७]बुलढाणा आणि मालेगाव येथील जाधव घराणे आपणास देवगिरीच्या यादव घराण्यातील व कृष्णाचे वंशज मानत.

**नंदुरबार-नंद अहिर (३ रे ते ११/१२ वे शतक)**

उत्तर महाराष्ट्रातील खान्देश विभागातील नंदुरबार हा एक जिल्हा होय.नंदुरबार शहराच्या पश्चिमोत्तर दिशेला गुजरात तर पुर्वोत्तर दिशेला मध्यप्रदेश स्थित आहे.[१८]नंदुरबारचा पहिला ऐतिहासिक उल्लेख नंदगिरा या नावाने ३ -या शतकातील कान्हेरी लेण्यांच्या लेखात आढळतो. नंदगिरी असे म्हणत.स्थानिक प्रचलित माहितीनुसार येथे राजा नंद हा गवळी वा अहिर राजा शासन करत होता त्यानेच नंदूरबार शहर वसविले ,त्यामुळेच त्याला नंदगिरी असे म्हणत.नंद राजाने बांधलेला गड किंवा दुर्ग म्हणजे नंदगिरी होय.याच शहरात नंद राजाचा दरबार भरायचा त्यामुळेच नंद+दरबार या

दोन शब्दावरून नंदुरबार हा शब्द तयार झाला आहे.मुस्लिमांच्या आगमनापर्यंत हा गड नंदराजाच्या ताब्यात होता,मुसलमानांचा प्रमुख सामिन मोईनुद्दीन चिश्ती याने सय्यद अलाउद्दिन पीर याला मदत केली.झालेल्या युद्धात नंदराजाने सय्यद पीर याचे डोके उडविले मात्र त्याचे धड लढतच राहिले ते पाहुन हिंदु सैन्यामध्ये घबराट पसरली व खान्देशातील नंद राजाचा पराभव होउन खान्देश परकिय राजवटीच्या अमलाखाली आला.[१९]

**गोपराष्ट्र-अंजनेरीचे अहिर**

महाभारतात एके ठिकाणी गोपराष्ट्राचा उल्लेख येतो.[२०] महाभारत ,पद्मपुराण,मार्कंडेयपुराण,वायुपूराण,इ.ग्रंथात आभीरदेश तसेच त्याच्या जवळच असणा-या गोपराष्ट्राविषयी माहिती मिळते.वास्तविक आभीरांनाच गोप अथवा यादव असे म्हटले जाई.महाभारत काळापासुनच खान्देशात मोठया प्रमाणात वसाहत करून असुन इ.स.१४ व्या शतकापर्यंत त्यांच्या विभिन्न शाखा विभिन्न काळात विभिन्न नावाने ओळखल्या गेल्या.त्यापैकी एक म्हणजे गोपराष्ट्र होय.नासिक जवळील अंजनेरी हे ठिकाण गोपराष्ट्र म्हणुन ओळखले जाई त्याची ही ओळख चालुक्य राजवटीतही कायम असल्याचे दिसते.[२१]

**गाविलगड-अहिर वा गवळीराजे**

महाभारतकाळात अहिर वा यादवांनी खान्देश व विदर्भात वसाहती केल्या त्यांच्या वसाहतींच्या पाउलखुणा आजही तिथे अहिर वा यादव समाजाच्या रूपाने अस्तित्वात आहे.या परिसरातील वास्तूशिल्प विकासालाही त्यांनी देणगी दिली.विदर्भातील गवळीगड वा गाविलगड हा त्यांच्या स्थापत्यकलेचा नमूना होय.[२२]अमरावती जिल्हयातील चिखलदरा या गावाच्या दक्षिणेला ३ कि.मी. दुर मेळघाट अभयारण्यात हा किल्ला स्थित आहे.[२३]

**थाळनेर- जिवाजी अहीर**

थाळनेर किल्ला भारताच्या इतिहासातील महत्वपूर्ण किल्ला राहिला आहे.ब-हाणपुर आणि सुरत आणि ब-हाणपुर रस्त्यावर हा किल्ला स्थित असल्यामुळे या किल्याला व्यापारी दृष्टया महत्व प्राप्त झाले धुळे जिल्हयातील शिरपूर तालूक्यात हा किल्ला स्थित आहे.इथे जावजी अहीर आणि गोवजी अहीरचे राज्य राहीले आहे.किल्ल्यावर थलेश्वर देवाचे मंदिर आहे या देवाच्या नावावरूनच किल्ल्याला थाळनेर नाव पडले असावे.फारूकी राजांनी हा किल्ला ताब्यात आल्यावर त्याला आपली राजधानी बनविली.[२४]

**प्रकाशा-ईश्वरात अहीर**

गुजरात राज्यातील छोटा उदेपूर जवळील कलछाला येथे सापडलेल्या ताम्रपटावरून ईश्वरात अहीर याची माहीती उपलब्ध होते.हा ताम्रपट चौथ्या शतकातील असावा असे विद्वानांचे मत आहे या ताम्रपटात त्याने स्वतःला परमभट्टारक पादानुध्यायात म्हटले आहे.अर्थातच अहीर राजांचा मांडलिक त्याचे राज्य मध्य गुजरात म्हणजे बडोदा

त्याच्या आसपासचा प्रदेश व धुळे जिल्हयाचा काही भाग होता.हा प्रदेश अहीर राज्याचाच एक भाग होता त्यामुळे तो अहीर राजा असावा असे तज्ज्ञांनी म्हटले आहे.[२५]

**वल्खचे आभीर घराणे.**

वल्खच्या राजघराण्याविषयी माहीती ताम्रपटातून उपलब्ध होते.इंदौर,शिरपूर इ.ठिकाणाहून त्यांचे ताम्रपट उपलब्ध झालेले आहेत ते ताम्रपट संस्कृत भाषेतील असून त्यामध्ये त्यांनी आभीर संवंताचा वापर केला आहे.या तामंपटातून त्यांनी स्वतःला परमभट्टारक पादानुध्यायात अर्थात सार्वभौम नृपतीच्या पायाचे चिंतन करणारा असे म्हटले आहे.अर्थातच परमभट्टारक ही उपाधी आभीर राजांची होती तसेच या आभीर शाखेपैकीच ते असावेत असे इतिहासकार प्रतिपादन करतात. हे सर्व ताम्रपट त्यांनी वाघळी या ठिकाणाहून दिले वाघळी हे ठिकाण चाळीसगाव पासून १५ मैलावर आहे यादव काळापासून हे ठिकाण प्रसिद्ध असून शिक्षण व संस्कृतीचे केंद्रबिंदु राहिले आहे.[२६]

**भामेर-लक्ष्मीदेव आभीर**

खान्देशात आभीर वा यादवांचे अनेक राजवंश होते व प्रायः त्यांच्यात संघर्षही होत असत .अंबा नामक स्थानाहून प्राप्त झालेल्या शिलालेखात यादव नृपती सिंघणदेव याचा सेनापती खोलेश्वर याने भामेर-भंबगिरी येथील राजा सिंहराज लक्ष्मीदेव आभीर याचा पराभव केल्याचा उल्लेख प्राप्त होतो अर्थातच १३ व्या शतकाच्या शेवटपर्यंत खान्देशात यादवांच्या अनेक शाखा कार्यरत असल्याचा संदर्भ प्राप्त होतो.भामेर हे गाव वर्तमान साक्री तालूक्यातील निजामपूर जवळ असून भामेर येथील किल्ला हा या लक्ष्मीदेव अहीरने बांधला.या भागात गवळी राजांचा किल्ला म्हणून लोकांमध्ये आख्यायिका प्रचलित आहेत.

**मालेगाव व सिंदखेड राजा - बुलढाणा येथील जाधव घराणे.**

सिंदखेड राजा येथील लखूजीराव जाधव यांचे घराणे स्वतःला देवगिरीच्या यादवांचे वंशज मानतात तसेच स्वतःला कृष्णाचे वंशज मानतात.[२७]महाराष्टाचा इतिहास व संस्कृती घडविण्यामध्ये या घराण्याचा फार मोठा वाटा आहे.तसेच मालेगाव येथेही देवगिरीच्या यादवांचीच एक शाखा राज्य करीत होती.

## उपसंहार

एकंदरीतच आभीरांना समृद्ध असा इतिहास लाभला असून खान्देशातील संस्कृतीवर त्यांची अमिट अशी छाप उमटलेली दिसते.आभीर,गोप,यादव या नावाने खान्देशासहित भारताच्या विभिन्न भुभागावर राज्य प्रस्थापित केल्याचे विभिन्न ऐतिहासिक,धार्मिक,साहित्यिक,पुरातत्वीय साधनांच्या आधारे स्पष्ट होते.

**संदर्भग्रंथ**

[१] प्रा.आहेर व्हि.ए.आभीर शब्दमीमांसा भारतीय शोध समग्र पत्रिका ७, जुलै-ऑगस्ट २०१३ पृष्ठ ९९-१०८

[२] महाराष्ट्र शासन गॅझेटिअर

[३] यादव रामदेवबाबु यदुकुल का इतिहास ,जे.यादव,२०१०, पृष्ठ क्र.२६

[४] जोशी श. गो.माध्यंदिन शाखा प्रकरण ,श्रीकृष्ण प्रिंटिग प्रेस ,१९४०,पृष्ठ क्र.३७

[५] चांदोरकर पा.मा.,खान्देश व खान्देशी भाषा, भारत इतिहास संशोधन मंडळ, पृष्ठ क्र.२०

[६] कुलकर्णी भा.र.अहिराणी भाषा व संस्कृती दि.ब.वाघमारे,१९४२

[७] जगताप पी.डी.संपा,खान्देशचा सांस्कृतिक इतिहास,का.स.वाणी २००४ पृष्ठ ६८

[८] प्रा.आहेर व्हि.ए.आभीर शब्दमीमांसा भारतीय शोध समग्र पत्रिका ७, जुलै-ऑगस्ट २०१३ पृष्ठ ९९-१०८

[९] कुलकर्णी भा.र.अहिराणी भाषा व संस्कृती दि.ब.वाघमारे,१९४२

[१०] ठाकुर देशराज, जाट इतिहास, दिल्ली:महाराजा सुरजमल शिक्षा संस्थान,१९३४ पृष्ठ क्र.३९

[११] प्रा.आहेर व्हि.ए.महाभारतकालीन बलाढय आभीर राजवंश भारतीय शोध समग्र पत्रिका ७, जुलै-ऑगस्ट २०१३ पृष्ठ ९९-१०८

[१२] प्रा.आहेर व्हि.ए.आभीर शब्दमीमांसा भारतीय शोध समग्र पत्रिका ७, जुलै-ऑगस्ट २०१३ पृष्ठ ९९-१०८

[१३] नासिक डिस्ट्रिक्ट गॅझेटिअर

[१४] रे सत्यजित,हेरिटेज ऑफ इंडिया कुशान कॉइन्स,पृष्ठ ६९

[१५] पाण्डे डॉ.राजबली,यदुवंश का इतिहास दिल्ली यदुकुल प्रकाशन

[१६] प्रा.आहेर व्हि.ए.ब्रज संस्कृती आभीर संस्कृती भारतीय शोध समग्र पत्रिका ७, जुलै-ऑगस्ट २०१३ पृष्ठ ६५-७३

[१७] तत्रैव

[18] Wikipedia.com

[१९] गॅझेटिअर विभाग धुळे

[20] कुलकर्णी भा.र.अहिराणी भाषा व संस्कृती दि.ब.वाघमारे,१९४२

[२१] नासिक डिस्ट्रिक्ट गॅझेटिअर

[22] Census of india 1991

[23] The gazetteer department vardha

[24] Cultural-maharashtra-gov-in the gazzettier department dhule

[25] पारोळकर गंगाधर(2004)आभीरायण पुणे.

[26] उपरोक्त

[27] Henige d.p.(2004)princely sttes of india a guide to chronology and rulers.orchid press p.no.185